


मडगाव पालिकेच्या शुल्क वाढीविरोधात आक्रमक भूमिका
पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



केकेआर - पंजाब आज भिडणार
पान ३ वर

वेर्णा, शनिवार, २६ एप्रिल २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 233 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 26 April 2025 | Pages 4 | ₹ 4

# ठरलं! पाकिस्तानला एक थेंबही पाणी जाणार नाही!

## भारताकडून हायपरसोनिक क्षेपणास्त्राची स्क्रॅमजेट चाचणी | पाकिस्तानचे धाबे दणाणले

**नवी दिल्ली, दि. २५ : पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने पाकिस्तानविरोधात कडक धोरणात्मक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या बैठकीनंतर जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, भारताकडून पाकिस्तानकडे एक थेंबही पाणी जाऊ देणार नाही, यासाठी ठोस धोरण तयार झाले आहे.**



मंत्री पाटील यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यासंदर्भात अनेक स्पष्ट निर्देश दिले असून, त्यांच्या अंमलबजावणीसाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. गृहमंत्री अमित शहा यांनीही या बैठकीत प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सूचना दिल्या.

पहलगाम हल्ल्यानंतर भारत सरकारकडून पाकिस्तानविरोधात विविध स्तरांवर कठोर उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवून, त्यांच्या व्हिसा स्थितीची पाहणी करून त्यांना तत्काळ देशाबाहेर करण्याचे निर्देश दिले आहेत.

पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या संशयितांवर सुरक्षा यंत्रणांकडून कठोर कारवाई सुरू आहे. दक्षिण काश्मीरमध्ये दोन संशयित हल्लेखोरांची घरे रात्रीच्या वेळी स्फोटकांचा वापर करून उद्ध्वस्त करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, त्राल तालुक्यातील मोंगाहम येथे आसिफ अहमद शेख याचे घर उद्ध्वस्त करण्यात आले. त्याचप्रमाणे, अनंतनाग जिल्ह्यातील बिजबेहरा परिसरातील गुर गावात राहणाऱ्या आदिल अहमद ठोकर याचे घरही २४ ते २५ एप्रिल दरम्यानच्या रात्री स्फोटकांनी उडवण्यात आले.

दरम्यान, पहलगाम हल्ल्यानंतर दहशतवाद संपवण्याचा विडा उचललेल्या भारताने आपल्या संरक्षण क्षमतांना वाढवण्यासाठी शुक्रवारी हायपरसोनिक क्षेपणास्त्रांच्या विकासासाठी स्क्रॅमजेट कम्बस्टरची यशस्वी चाचणी केली आहे. यामुळे पाकिस्तानचे आणखी धाबे दणाणले आहेत. भारतकडून कधीही हल्ला होऊ शकतो या शक्यतेने पाकिस्तानने भारत – पाक सीमेवर सैन्याची जमवाजमव सुरु केली आहे.

भारताच्या लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी शुक्रवारी श्रीनगर दौरा केला असून जम्मू–काश्मीरमधील सुरक्षा परिस्थितीचा त्यांनी आढावा घेतला. त्यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या ठिकाणाला भेट दिली आणि सुरक्षा व्यवस्थेचा पुनरावलोकन केला. पाकिस्तानमध्ये असलेले दहशतवादी भारताच्या सीमांवर हल्ले करत असून, भारतीय सुरक्षा दलांनी त्यांचा कडव्या प्रतिसाद दिला आहे. भारतीय लष्कराने नियंत्रण रेषेवर (एलओसी) सुरू असलेल्या गोळीबाराला योग्य प्रत्युत्तर दिले आहे. गोळीबारात कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. या युद्धजन्य परिस्थितीने आणखी गंभीर रूप धारण केले आहे.

दक्षिण काश्मीरमधील त्राल, बिजबेहरा आणि मोंगाहम या भागात सुरक्षा दलांनी दहशतवाद्यांचा मागोवा घेतला आहे. तीन दहशतवादी फरार असल्यामुळे, सुरक्षा दलांनी कोम्बिंग ऑपरेशन सुरु केले आहे. सुरक्षा दलांच्या तपासासाठी, विशेष पोलिस दल आणि सीआरपीएफ सक्रिय आहेत. काश्मीरमध्ये दहशतवादाच्या घटनांच्या तीव्रतेमध्ये वाढ झाली असून, घटनास्थळी तात्काळ पाऊले उचलली जात आहेत.

शुक्रवारी जम्मू–काश्मीरमधील बांदीपोरा येथे दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाल्याचे वृत्त आहे. भारतीय लष्कराच्या चिनार कॉर्प्सने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वरील त्यांच्या अकाउंटवरून या चकमकीची माहिती दिली आहे. पोस्टमध्ये म्हटले आहे की, दहशतवाद्यांच्या उपस्थितीबाबतच्या विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे, भारतीय लष्कर आणि जम्मू–काश्मीर पोलिसांनी बांदीपोराच्या कोलनेर अजस भागात संयुक्त शोध मोहीम सुरू केली.लष्कराच्या म्हणण्यानुसार, अतिरेक्यांसोबतची चकमक अजूनही सुरू आहे. गुरुवारी उधमपूरमध्ये सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत एक जवान शहीद झाला.

जम्मू–काश्मीरमधील हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांनी भारत आणि पाकिस्तानला संयम राखण्याचे आवाहन केले आहे. संयुक्त राष्ट्रांच्या महासचिव अँटोनियो गुटेरेस यांच्या प्रवक्त्याने सांगितले की, दोन्ही देशांना चांगला संवाद साधत, परिस्थिती आणखी बिघडू न देण्याचे महत्त्व आहे. या संदर्भात, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदींशी चर्चा केली आणि हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या लोकांबद्दल शोक व्यक्त केला.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी शुक्रवारी श्रीनगरला पोहोचले आणि पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात जखमी झालेल्यांची भेट घेतली. यानंतर राहुल गांधी यांनी जम्मू–काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांची भेट घेतली आणि पहलगाममधील पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याबद्दल चर्चा केली. बैठकीनंतर राहुल गांधी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, ही एक भयानक दुर्घटना आहे. मी परिस्थिती जाणून घेण्यासाठी आणि मदत करण्यासाठी येथे आलो आहे. जम्मू आणि काश्मीरमधील सर्व लोकांनी या भयानक हल्ल्याचा निषेध केला आहे आणि ते यावेळी देशासोबत आहेत. मी जखमींपैकी एकाला भेटलो आहे. माझे प्रेम आणि आपुलकी त्या सर्वांसोबत आहे ज्यांनी त्यांचे कुटुंबीय गमावले आहेत. मी सर्वांना सांगू इच्छितो की संपूर्ण देश त्यांच्यासोबत उभा आहे.

ते म्हणाले की, काही लोक काश्मीर आणि देशातील आपल्या

पान २ ▶

## निवडक

### सोनिया गांधींना नोटीस देण्यास नकार

नवी दिल्ली, दि. २५ : नॅशनल हेराल्ड मनी लॉँड्रिंग प्रकरणात सोनिया गांधी, राहुल गांधी यांना नोटीस बजावण्यास दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टाने नकार दिला. आरोपींची बाजू ऐकल्याशिवाय आम्ही नोटीस बजावू शकत नाही, असे न्यायालयाने शुक्रवारी सांगितले. विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) याचिकेवर सुनावणी केली. ते म्हणाले, 'ईडीच्या आरोपपत्रात काही कागदपत्रेही गहाळ आहेत. ती कागदपत्रे जमा करा. त्यानंतर आम्ही सोनिया आणि राहुल यांना नोटीस बजावण्याचा निर्णय घेऊ. ९ एप्रिल रोजी, ईडीने काँग्रेस समर्थित नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र आणि असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) यांच्याशी संबंधित मनी लॉँड्रिंग प्रकरणात पहिले आरोपपत्र दाखल केले होते. यामध्ये सोनिया गांधी, राहुल गांधी, सॅम पित्रोदा आणि सुमन दुबे यांची नावे होती.

-----------

### सिक्कीममध्ये भूस्खलन

गंगटोक, दि. २५ : सिक्कीममध्ये मूसळधार पाऊस आणि भूस्खलन झाले आहे. त्यामुळे तिथे हजारो पर्यटक अडकले आहेत. सिक्कीमच्या लाचेन–चूंगथांग मार्ग आणि लाचून–चूंगथांग मार्गावरील संपूर्ण वाहतूक विस्कळीत झाली आहे. सिक्कीममध्ये मुसळधार पावसामुळे रस्त्यांना नद्यांचे स्वरूप प्राप्त झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी भूस्खलन झाल्याने रस्त्यांवर ढिगारे साचले आहेत. जोरदार पावसामुळे हा ढिगाराही हटवता येत नाही. सिक्कीममध्ये पावसाची संततधार सुरू आहे. त्यामुळे बचावकार्य करण्यास अडथळा येत आहे. सिक्कीममध्ये येणाऱ्या पर्यटकांसाठी सूचना जारी करण्यात आली आहे.

----------

### तोयबाचा कमांडर अल्ताफ याचा खात्मा

जम्मू, दि. २५ : जम्मू–कश्मीरमधील अंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथील बैसरणा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देश हादरून गेला आहे. या हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याला सडेतोड उत्तर देण्यासाठी सुरक्षा दलाच्या जवानांनी जम्मू–कश्मीरमध्ये सुरू केलेल्या शोधमोहिमेला यश आले असून बांदीपुरा येथे झालेल्या चकमकीत लश्कर–ए–तोयबा या दहशतवादी संघटनेचा कमांडर अल्ताफ लाली याचा खात्मा करण्यात आला आहे. बांदीपुरा जिल्ह्यातील कुलनार भागामध्ये शुक्रवारी सकाळी सुरक्षा दलाचे जवान आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक उडाली. यादरम्यान लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी जवानांवर गोळीबार केला. या गोळीबारात दोन जवान जखमी झाले आहेत. जवानांनी दहशतवाद्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले असून लश्करच्या टॉपच्या कमांडरचा खात्मा केला आहे.

--------------

### मेधा पाटकर यांना अटक

नवी दिल्ली, दि. २५ : दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यात आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. याआधी बुधवारी साकेत न्यायालयाने त्यांच्याविरुद्ध अजामीनपात्र अटक वॉरंट जारी केले होते. नर्मदा बचाव आंदोलनाच्या संस्थापक मेधा पाटकर यांनी २५ नोव्हेंबर २००० रोजी एक प्रसिद्धी पत्रक जारी केले होते. देशभक्ताचा खरा चेहरा या नावाने हे प्रसिद्धी पत्रक होते. व्ही. के. सक्सेना हे देशभक्त नसून भित्रे आहेत. हवाला रॅकेटमध्ये सक्सेना यांचा हात असल्याचा गंभीर आरोप प्रसिद्धी पत्रकात करण्यात आला होता. सक्सेना यांनी २००१ मध्ये महानगर दंडाधिकारी न्यायालयात मेधा पाटकर यांच्याविरोधात बदनामीचा खटला दाखल केला. २००३ मध्ये दिल्लीच्या साकेत महानगर दंडाधिकारी न्यायालयात हा खटला चालला.

# गोव्यात १ हजार कोटींच्या जमीन घोटाळ्याप्रकरणी ईडीचे छापे

▶ कोण आहे हा रोहन हरमलकर? हरमलकरचा आका कोण?

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २५** : प्रिव्हेन्शन ऑफ मनी लॉँडरिंग ॲक्ट (पीएमएलए) अंतर्गत सुरू असलेल्या मोठ्या जमीन घोटाळ्याच्या तपासाच्या अनुषंगाने अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) २४ आणि २५ एप्रिल २०२५ रोजी गोव्यात अनेक ठिकाणी छापेमारी केली. या कारवाईत करोडो रुपयांच्या मालमत्तेशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे आणि पुरावे जप्त करण्यात आले आहेत.



ईडीने जारी केलेल्या अधिकृत निवेदनानुसार, या घोटाळ्याचा प्रमुख सूत्रधार रोहन हरमलकर असून, त्याने बनावट दस्तऐवजांच्या आधारे महसूल नोंदींमध्ये फेरफार करत गोव्यातील उच्च–मूल्याच्या जमिनी बेकायदेशीररीत्या बळकावल्या. हणजूण, हडफडे आणि आसगावसारख्या पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या भागांतील लाखो चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या जमिनींच्या फसव्या हस्तांतरणात त्याचा सहभाग असल्याचे उघड झाले आहे.

ईडीच्या तपासात समोर आलेल्या माहितीप्रमाणे, या प्रकरणात संशयितांनी बनावट मालकी हक्क दाखवणारी कागदपत्रे वापरून जमिनीच्या नोंदींमध्ये छेडछाड केली. यातून सुमारे १ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक बाजारमूल्य असलेल्या मालमत्तांचे बेकायदेशीर व्यवहार झाले. छाप्यांदरम्यान ६०० कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या स्थावर मालमत्तांची मूळ कागदपत्रे देखील जप्त करण्यात आली आहेत.

प्राथमिक तपासानुसार, गुन्ह्यातून मिळवलेले पैसे विविध व्यक्ती आणि बेनामी संस्थांच्या माध्यमातून लॉँडर करून रिअल इस्टेट, आलिशान वाहने आणि अन्य मौल्यवान मालमत्तांमध्ये गुंतवले गेले होते.

ईडीने स्पष्ट केले की, या प्रकरणात इतर लाभार्थी कोण आहेत, तसेच या बेकायदेशीर व्यवहारांमध्ये कोणत्या सरकारी अधिकाऱ्यांचा सहभाग आहे, याचा शोध घेण्यासाठी सखोल तपास सुरू आहे. दरम्यान, गोव्यातील जमीन हडप प्रकरणांची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) यापूर्वीच रोहन हरमलकर आणि अन्य १३ जणांवर हणजूण परिसरातील जमिनीच्या बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक व बळकावणी केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला होता. विशेष म्हणजे, हरमलकरला यापूर्वीही चेक बाउन्स प्रकरणात अटक करण्यात आली होती.

# पाकड्यांवर लक्ष ठेवण्यासाठी मुख्यमंत्र्यांची उच्चस्तरीय बैठक

## आजपासून कोंबिंग ऑपरेशन सुरू | रेल्वे स्थानके, विमानतळांवरील सुरक्षेत वाढ

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २५** : भारत–पाकिस्तान दरम्यान वाढत चाललेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी राज्यातील पाकिस्तानी नागरिकांची माहिती घेण्यासाठी आणि सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी गृह विभाग, गोवा पोलिस आणि इतर सुरक्षा संस्थांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत पर्वरी येथील मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक घेतली.

बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले की, सध्या गोव्यात अल्पकालीन व्हिसावर राहणाऱ्या तीन पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवण्यात आली असून त्यांना भारत सोडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय, १७ पाकिस्तानी नागरिक दीर्घकालीन व्हिसावर गोव्यात वास्तव्यास असून त्यांच्या हालचालींवर सुरक्षा यंत्रणांकडून बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले की, शनिवारपासून राज्यात 'कोम्बिंग ऑपरेशन्स' सुरू करण्यात येणार असून स्थलांतरित नागरिक राहत असलेल्या वस्त्यांमध्ये तपास मोहीम राबवली जाईल. रेल्वे स्थानके, विमानतळे आणि बस स्थानकांवरील सुरक्षा वाढवण्यात आली आहे. परदेशी नागरिकांच्या ओळखींची पडताळणी सुरू असून, विशेषतः मुदतवाढीनंतरही येथे थांबलेल्या नागरिकांवर लक्ष केंद्रित आहे, असे त्यांनी नमूद केले.

### नौकांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणार

**राज्यात ८२६ मासेमारी ट्रॉलर आणि १,२०६ पारंपरिक कॅनो असल्याची माहिती देत, मुख्यमंत्र्यांनी सांगितले की या नौकांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासली जाणार असून भविष्यात त्यांच्यासाठी बायोमेट्रिक नोंदणीस सुरुवात होणार आहे. राज्यातील सहा लँडिंग जेट्टी आणि २८ रॅम्पवरही तपासणी तीव्र केली जाईल.**

मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, संशयास्पद व्यक्तींना चौकशीसाठी ताब्यात घेण्याचे निर्देश देण्यात आले असून, स्थलांतरित नागरिकांनी ओळखपत्रांसह (जसे की आधार कार्ड किंवा मतदार ओळखपत्र) स्वतःची ओळख सादर करावी, अन्यथा त्यांच्यावर कारवाई केली जाईल. राज्यभरात पोलिसांकडून रात्रीच्या वेळी अचानक 'नाकाबंदी' (चेक–पोस्ट) लावण्याचे आदेश देण्यात आले असून पर्यटन स्थळांवरील पोलिसांची उपस्थितीही वाढवण्यात आली आहे. गुप्तचर विभागाने माहिती संकलनास प्रारंभ केला असून नागरिकांनी सुरक्षा यंत्रणांना सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने जारी केलेल्या सुरक्षाविषयक सल्ल्याचे पालन राज्य सरकारकडून पूर्णतः केले जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. गोव्यात शिक्षण घेणाऱ्या अथवा व्यवसायासाठी राहणाऱ्या काश्मिरी नागरिकांनी स्थानिक पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा, जेणेकरून त्यांना योग्य ती सुरक्षा पुरवता येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पोलिस विभाग सोशल मीडियावर देखील लक्ष ठेवून आहे. बंदी घालण्यात आलेल्या संघटनांशी (उदा. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया – सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया ) संबंधित व्यक्तींना चौकशीसाठी पुन्हा पोलिस ठाण्यांमध्ये बोलावण्यात येणार आहे.

आठवडी बाजारात सहभागी होणाऱ्या स्थलांतरितांनी वैध ओळखपत्रे जवळ बाळगणे अनिवार्य असून, योग्य दस्तऐवज नसलेल्या व्यक्तींवर कारवाई केली जाईल. हॉटेल्स आणि इतर पर्यटक निवास सुविधा चालवणाऱ्यांना फॉर्म 'सी ' अनिवार्यपणे भरावा लागणार आहे. हा फॉर्म परदेशी पाहुण्यांच्या आगमनाची आणि मुक्कामाची माहिती परदेशी प्रादेशिक नोंदणी कार्यालयास कळवण्यासाठी वापरण्यात येतो. या उच्चस्तरीय बैठकीस केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल भारतीय नौदल, भारतीय तटरक्षक दल आणि गोवा पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# पाकिस्तानच्या निर्णयामुळे भारतीय विमान सेवा महागणार

## पश्चिम आशिया, युरोप, ब्रिटन आणि उत्तर अमेरिकेसाठी उड्डाण करताना अधिक लांब मार्ग घेणे आवश्यक

**जम्मू, दि. २५** : जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरुद्ध काही कठोर पावले उचलली आहेत. यावर पाकिस्तानने प्रत्युत्तर देत भारतीय विमान कंपन्यांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे भारताच्या विमान कंपन्यांना पाकिस्तानी हवाई क्षेत्र ओलांडून पश्चिम आशिया, युरोप, ब्रिटन आणि उत्तर अमेरिकेसाठी उड्डाण करताना अधिक लांब मार्ग घेणे आवश्यक होणार आहे.

गुरुवारी, २५ एप्रिल रोजी पाकिस्तानने या निर्णयाची घोषणा केली. पाकिस्तानच्या या घोषणेनुसार, संध्याकाळी ६ नंतर कोणत्याही भारतीय विमानाला पाकिस्तानी हवाई क्षेत्रातून उड्डाण करण्याची परवानगी नाही. यामुळे दिल्ली, लखनऊ, अमृतसर यांसारख्या विमानतळांवरून उड्डाण करणाऱ्या भारतीय विमान कंपन्यांना आता पाकिस्तानच्या हवाई क्षेत्रापासून दूर राहून इतर मार्गांचा अवलंब करावा लागेल.

२०१९ मध्ये, पाकिस्तानने बालाकोट हवाई हल्ल्यानंतर देखील भारतीय विमान कंपन्यांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद केले होते. त्या वेळी, भारतीय विमान कंपन्यांना सुमारे ५०० कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. यावेळीही असेच नुकसान होण्याची शक्यता आहे. विमान वाहतूक सल्लागार जितेंद्र भार्गव यांचे मत आहे की, मुंबईहून उड्डाण करणाऱ्या विमानांवर फारसा परिणाम होणार नाही, परंतु दिल्लीहून उड्डाण करणाऱ्या विमानांसाठी उड्डाण वेळात ३० मिनिटांची वाढ होऊ शकते.

या नवीन निर्बंधांचा सर्वाधिक परिणाम दिल्लीहून उड्डाण करणाऱ्या विमानांवर होईल. पाकिस्तानच्या हवाई क्षेत्राच्या बंदीमुळे त्या विमान कंपन्यांना आता गुजरात आणि महाराष्ट्रकडे वळवून पश्चिम आशिया, युरोप आणि उत्तर अमेरिकेच्या दिशेने उड्डाण करावे लागेल. यामुळे त्यांच्या उड्डाणाचा वेळ वाढेल आणि इंधन खर्च देखील वाढेल.

इंधनाच्या किंमतीत वाढ होणे, तसेच उड्डाण मार्गाची लांबी वाढविल्याने इतर अतिरिक्त खर्चही होईल. विमान कंपन्यांना अधिक इंधनाची आवश्यकता असेल, आणि त्यामुळे कंपन्या भविष्यात तिकिटांच्या किमती वाढवण्यास मजबूर होऊ शकतात. एटीएफ (एव्हिएशन टर्बाइन फ्यूल) ची किंमत सध्या प्रति किलोलिटर ७९४.४१ डॉलर आहे. त्यामुळे, हवाई कंपन्यांना अतिरिक्त इंधन खरेदी करणे आणि अधिक इंधन खर्च करणे आवश्यक होईल.

पाकिस्तानच्या हवाई क्षेत्राच्या बंदीमुळे भारतीय कंपन्यांच्या

पान २ ▶

# कॅसिनोधारकांच्या फायद्यासाठी सरकारकडून जमीन वाटप

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २५** : पणजीतील रहिवाशांनी शहरातील सार्वजनिक मालमत्तांचे खाजगी कॅसिनो ऑपरेटरना हस्तांतर केल्याबद्दल राज्य सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, क्वार्टरडेक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'पणजी पार्क' परिसरातील प्रस्तावित बांधकामास तीव्र विरोध दर्शवला आहे.

सदर परिसरात ३०० टक्के एफएआरसह उच्चभिंती इमारतीस परवानगी देण्याच्या सरकारी प्रस्तावाला स्थानिकांनी आक्षेप घेतला आहे. पणजी विकास आराखड्यानुसार, हा परिसर 'मनोरंजन क्षेत्र' म्हणून अधोरेखित करण्यात आला आहे. तथापि, रहिवाशांच्या मते, सरकारने संबंधित जमीन भाडेकरूचे कर्ज थकवले गेले म्हणून परत मिळवून ती एका खाजगी पक्षाला दीर्घकालीन भाडेपट्ट्यावर दिली आहे. याशिवाय, शेजारील जागाही एका कॅसिनो ऑपरेटरकडे सुपूर्द करण्यात आली आहे.

पणजीतील रहिवासी वास्को डायस यांनी सरकारवर कठोर टीका करत म्हटले की, पूर्वी सरकारचा आधार खाण उद्योग होता, आता मात्र ते कॅसिनोवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून आहे. कॅसिनोंनी संपूर्ण शहर वेढले असून, मांडवी नदीकिनारी गर्दी व पार्किंगचा मोठा प्रश्न निर्माण केला आहे. संध्याकाळी दयानंद बांदोडकर मार्गावर दोन्ही बाजूंना पार्किंगचा खच असतो. सरकार कॅसिनोच्या तालावर नाचत आहे. एक दिवस हे शहर स्थानिकांच्या ऐवजी कॅसिनोधारकांचे ठिकाण होईल आणि पणजीचे लास वेगासमध्ये रूपांतर होईल.

त्यांनी आणखी सांगितले की, ऑफशोअर कॅसिनोंच्या स्थलांतराची कोणतीही ठोस योजना नाही. सरकार फक्त आश्वासने देते, कृती करत नाही. पार्किंगसाठी कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेली सुविधा खाजगी कॅसिनोधारकांना दिली गेली आहे.

पान २ ▶